दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा

कार्यकारी संपादक : कैलास फुलारी




वर्ष : ०१ ले * अंक : ३८ * जालना * * मंगळवार ०८ सप्टेंबर २०२६ * * पाने : ४ * *किंमत : २ रूपये *

# परतूरला ३२ वर्षांनंतर पुन्हा युवक महोत्सवाचे यजमानपद

## मोबाईलच्या आभासी जगातून बाहेर पडून करिअर घडवा; राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचे युवकांना आवाहन







परतूर, दि.७ : मोबाईच्या स्क्रिनवरील अभासी जगातून बाहेर येऊन तरुणांनी आपले करिअर घडविण्याची गरज आहे. संधीचं प्रचंड अवकाश तुम्हाला खुणावत आहे, त्यात भरारी घ्या, असे आवाहन महिला व बालकल्याण राज्यमंत्री मा.ना.मेघनाताई साकोरे-बोर्डीकर यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सव मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतूर व स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने ७ व ८ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात सोमवारी (दि. सात) पालकमंत्री मा.ना.मेघनाताई बोर्डीकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. कुलगुरू डॉ.विजय फुलारी अध्यक्षस्थानी होते. यावेळी संस्थेचे सचिव, माजी अधिसभा सदस्य कपिल आकात, उपाध्यक्ष डॉ. कुणाल आकात, माजी बीसीयुडी संचालक प्राचार्य डॉ. भागवत कटारे, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.कैलास अंभुरे, संस्थेचे संचालक गोविंदराव थिटे, व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ भारत खंदारे, जिल्हा समन्वयक प्राचार्य डॉ सुधाकर जाधव, अधिसभा सदस्य डॉ.मुंजाभाऊ धोंडगे, प्रा. हरिदास सोमवंशी, पोलीस निरीक्षक सुदाम भागवत, संयोजन समिती सदस्य डॉ. दिलीप महालिंगे, डॉ. किशोर शिरसाठ, डॉ.समाधान इंगळे, डॉ.संजय शिंदे, डॉ.शशिकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मेघनाताई बोर्डीकर म्हणाल्या, युवा शक्ती हीच खरी ताकद असून महासत्तेचे स्वप्न ही आपण साकारु शकतो. जिल्हा स्तरावर होत असलेल्या युवक महोत्सवात मुलींचे वाढलेले प्रमाण ही आनंदाची गोष्ट आहे, या महोत्सवात राज्य-राष्ट्रीय सतरावरील कलावंत घडावेत, अशी अपेक्षा ही त्यांनी व्यक्त केली. युवक महोत्सवात जालना जिल्ह्यातून ७९ महाविद्यालयांचे ५८१ कलावंत सहभागी झाले आहेत. यामध्ये २९२ मुले तर २८९ मुलींचा सहभाग आहे, असे विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ. कैलास अंभुरे यांनी प्रास्ताविकात सांगितले. प्रख्यात साहित्यिक बी. रघुनाथ यांची जन्मभूमी ही याच तालुक्यात आहे. तसेच १९३७ मध्ये मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे पहिले अधिवेशन या शहरात संपन्न झाले होते, असेही ते म्हणाले. डॉ.समाधान इंगळे यांनी सूत्रसंचालन तर प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांनी आभार मानले.उद्घाटन सोहळ्यापूर्वी शोभायात्रा काढण्यात आली. तसेच विद्यापीठ ध्वज कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते फडकाविण्यात आला. डॉ. नेताजी मुळे यांनी या कार्यक्रमाचे संचालन केले.

### कलावंत हीच आपली ओळख : मा.कुलगुरु

कोणत्याही कलावंताला जात, धर्म, भाषा, प्रांत अशा चौकटीत अडकवून ठेवता येत नाही. तर खरा कलावंत आणि कलेवरची त्याची श्रध्दा हीच खरी ओळख असते, असे कुलगुरु डॉ.विजय फुलारी अध्यक्षीय समारोपात म्हणाले. विद्यार्थ्यांची उपस्थिती व कॉपीमुक्त परीक्षा याबाबत विद्यापीठ कोणाचीही गय करणार नाही, असेही ते म्हणाले.सध्याची युवा पिढी अत्यंत हुशार असून मोबाईलच्या स्क्रिनने त्यांच्या प्रगतीत अडथळा येत आहे. यातून बाहेर पडल्यावर जग किती मोठे आहे आणि आपणास त्यात आकाश शोधावयाचे आहे हे समजेल. त्यामुले रिल लाईफमधून रियल लाईफमध्ये या, असे कुलगुरु डॉ.विजय फुलारी म्हणाले. युवक महोत्सवात विद्यार्थिनींचा सहभाग वाढावा यासाठी जिल्हा युवक महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. साहित्य, कला आणि विज्ञान क्षेत्रात संशोधनाला वाव मिळावा यासाठी विद्यापीठाने जिल्हावार अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन केले आहे, यातही सहभाग नोंदवा. सोशल मीडियाच्या या काळात विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या माध्यमातून जगाचा कचरा उकरत बसण्यापेक्षा आपले स्वतःचे अस्तित्व सिद्ध करावे. चांगले आदर्श डोळ्यासमोर ठेवून स्वतः तसे घडावे, असे आवाहनही डॉ फुलारी यांनी केले.

### पहिल्यापेक्षही हा महोत्सव संस्मरणीय करू: कपिल आकात

ऐतिहासिक पार्श्वभूमी असलेल्या परतुरमध्ये आमच्या संस्थेने १९९४ मध्ये केंद्रीय युवक महोत्सवाचे यशस्वी आयोजन केले. ३२ वर्षानंतर होत असलेला हा युवक महोत्सव अधिक संस्मरणीय कर, असे संस्थेचे सचिव कपिल आकात यांनी केले . महोत्सवाचा नागरिक, रसिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## राघवचा वाढदिवस दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत साजरा; विद्यार्थ्यांना प्रेमपूर्वक भोजनाची मेजवानी



**नवनाथ गव्हाणे बदनापूर : प्रतिनिधी धोपटेश्वर** : मतिमंद निवासी विद्यालय, धोपटेश्वर, ता. बदनापूर, जि. जालना येथे चि. राघव (कान्हा) शिवाजीराव शिंदे, सायगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांसाठी भोजनाचा कार्यक्रम उत्साहात व आनंददायी वातावरणात पार पडला. यावेळी केक कापून राघवचा वाढदिवस साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे राघवने स्वतः दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रेमाने केक भरवला तसेच स्वतः च्या हाताने भोजनाचे वाटप करून त्यांच्यासोबत वाढदिवसाचा आनंद साजरा केला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि आनंदाचा क्षण उपस्थितांसाठी भावूक व अविस्मरणीय ठरला. राघव (कान्हा) हा सद्गुरू सोलारचे सर्वेसर्वा श्री. शिवाजीराव (भाऊ) शिंदे, सायगावकर यांचा चिरंजीव आहे. शिवाजीराव शिंदे हे सामाजिक तसेच शैक्षणिक कार्यात नेहमीच अग्रेसर असून, समाजातील गरजू घटकांसाठी विविध उपक्रम राबवित असतात. या सामाजिक उपक्रमाचे आयोजन स्वराज्य साऊंड, धोपटेश्वरचे कडुबाभाऊ जारे यांनी केले होते. त्यांनी विद्यार्थ्यांसोबत वाढदिवसाचा आनंद साजरा करत त्यांच्यासाठी प्रेमपूर्वक भोजनाची व्यवस्था केली. स्वतःपुरता आनंद मर्यादित न ठेवता गरजू **(पान ३ वर)**

## मराठवाड्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

बदनापूर, प्रतिनिधी : मराठवाड्यात जून-जुलै महिन्यात झालेल्या अत्यल्प व खंडित पावसामुळे खरीप पिकांसह फळबागा आणि ऊस पिकांवर गंभीर परिणाम झाला असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर मराठवाड्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. आम आदमी पार्टीचे कुंभारी, ता. बदनापूर येथील ॲड. योगेश गुलाबपल्ली आणि अनिल ढवळे यांनी ७ सप्टेंबर रोजी हे निवेदन दिले आहे. मराठवाड्यात जून-जुलै महिन्यात अत्यल्प व खंडित पाऊस झाल्याने खरीप पिकांसह फळबागा व ऊस पिकांवरही गंभीर परिणाम झाला असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

पावसाअभावी जमिनीतील ओलावा कमी होत असून उपलब्ध पाणीसाठाही झपाट्याने घटत आहे. त्यामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होऊन उत्पादनात मोठी घट होण्याची भीती निर्माण झाली आहे. **(पान ३ वर)**

## शोभायात्रेत भारतीय संस्कृती, फुलेंच्या विचारांचा जागर

परतूर, दि.७: हजारो वर्षांचा इतिहास असलेली भारतीय ज्ञान परंपरा व महात्मा ज्योतीबा फुले यांच्या कार्यकर्तृत्वाचा जागर युवक महोत्सवाच्या शोभायात्रेत करण्यात आला. जालना जिल्हयातील १७ महाविद्यालयांचे संघ शोभायात्रेत सहभागी झाले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवक महोत्सवाची सुरुवात सोमवारी (दि.चार) सकाळी शोभायात्रेने करण्यात आली. महोदव मंदीर ते लालबहादूर शास्त्री महाविद्यालय या दरम्यान शोभायात्रा काढण्यात आली. उपविभागीय विभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांनी यात्रेस झेंडा दाखविला. संचालक डॉ.कैलास अंभुरे , प्राचार्य डॉ.भागवत कटारे, डॉ भारत खंदारे, डॉ.कैलास अंभुरे,डॉ सुधाकर जाधव, डॉ सखाराम टकले, डॉ.शैलेंद्र शेलार आदीसह शिक्षक, १७ महाविद्यालयांचे युवक कलावंत पारंपरिक वेशात शोभायात्रेत सहभागी झाले. या यात्रेत लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, विवेकानंद महाविद्यालय, जालना **(पान ३ वर)**

### १७ महाविद्यालयांचे कलावंत सहभागी



# महाकाल सेनेच्या कावड यात्रेने परतूर नगरी शिवमय

## दहा फुटी नंदीवर शंकर-पार्वतीचा सजीव देखावा; अघोरींच्या प्रात्यक्षिकांसह महादेव, तात्या विंचू व बजरंगबलीच्या देखाव्यांनी वेधले लक्ष







परतूर, प्रतिनिधी : महाकाल सेनेच्या वतीने परतूर शहरात भव्य कावड यात्रेचे आयोजन करण्यात आले. भगवान शंकराचा जयघोष, आकर्षक सजीव देखावे आणि अघोरींच्या विविध प्रात्यक्षिकांमुळे संपूर्ण शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गोळेगाव येथून आणलेल्या गंगामाईच्या पवित्र जलाने कुरुक्षेत्र महादेव मंदिरातील महादेवाला जलाभिषेक करून कावड यात्रेची सांगता करण्यात आली. कावड यात्रेतील कावडधारी भाविकांनी आदल्या रात्री गोळेगाव येथे जाऊन गंगामाईचे पवित्र जल घेतले. तेथून रात्रीच कावडधारी भाविकांनी आष्टी, शिष्टी, दैठणा, शिंगणा मार्गे पायी प्रवास केला. सकाळी सुमारे नऊ वाजता कावडधारी परतूर शहरातील छत्रपती संभाजी राजे उड्डाणपुलाजवळ दाखल झाले. येथे त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. त्यानंतर छत्रपती संभाजी राजे उड्डाणपुलापासून शहरातील कावड यात्रेला सुरुवात झाली. महादेव मंदिर चौक, पंचवटी चौक, जिल्हा परिषद शाळा, पोलीस चौकी, दसमले चौक आदी प्रमुख मार्गांवरून ही यात्रा कुरुक्षेत्र महादेव मंदिराकडे मार्गस्थ झाली. मार्गभर भगवान शंकराच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. दहा फुटी नंदीवरील शंकर-पार्वतीचा देखावा ठरला आकर्षण कावड यात्रेत साकारण्यात आलेले विविध सजीव देखावे नागरिकांच्या आकर्षणाचे केंद्र ठरले. दहा फुटी नंदीवर भगवान शंकर आणि माता पार्वती यांचा सजीव देखावा विशेष लक्षवेधी ठरला. याशिवाय भगवान महादेवाची सुमारे दहा फुटी भव्य प्रतिमा यात्रेत सहभागी करण्यात आली होती. यात्रेत सहभागी अघोरींच्या वेशभूषेतील कलाकारांनी शहरातील विविध चौकांत प्रात्यक्षिके सादर केली. त्यांच्या सादरीकरणाला नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यासोबतच ‘तात्या विंचू’चा सजीव देखावा तसेच बजरंगबली हनुमानाचा सजीव देखावा देखील यात्रेचे प्रमुख आकर्षण ठरला. शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत कावड यात्रा अखेर कुरुक्षेत्र महादेव मंदिरात पोहोचली. येथे गोळेगाव येथून कावडीतून आणलेल्या गंगामाईच्या पवित्र जलाने भगवान महादेवाला विधिवत जलाभिषेक करण्यात आला. यानंतर कावड यात्रेची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. महाकाल सेनेच्या या कावड यात्रेमुळे दिवसभर परतूर शहरात ‘हर हर महादेव’, ‘बम बम भोले’ च्या जयघोषासह उत्साहाचे आणि शिवभक्तीचे वातावरण पाहायला मिळाले.

# संपादकीय

## साक्षरता अभियान युध्दपातळीवर व्हायला पाहिजे

आजच्या परिस्थितीत ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण कमी आहे तो देश मागासलेल्या देशाच्या रांगेत येतो. भारतातील आदीवासी भाग व अती दुर्गम भाग अजून पर्यंत साक्षर नाहीत.त्यामुळे त्यांना अनेक कठीण प्रसंगांचा सामना करावा लागतो.साक्षरतेच्या अभावामुळे देशातील अनेक दुर्गम भागातील राज्यात नक्षलवादाचा किंवा गुन्हेगारांचा जन्म होतो.अती दुर्गम भागात पोषक आहाराची व योग्य शिक्षणाची गरज आहे अन्यथा येथुनच कुपोषण, भुकमरी,वाममार्ग व आत्महत्येचा उदय होत असतो. भारतातील वाढती लोकसंख्या ही साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेली मोठी समस्या आहे.भारतातील वाढत्या लोकसंख्येमुळे धर्मा-धर्मात कटुता निर्माण होते आणि धर्माच्या नावावर लोकसंख्या वाढवीण्याची शर्यत लागते.यामुळेच भारताला लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. भारतातील वाढती लोकसंख्या नियंत्रीत ठेवण्यासाठी भारताने साक्षरता अभियान युध्दपातळीवर राबवायला हवे.जगातील अनेक देश प्रगतीपथावर आहेत. आज प्रत्येक देशाजवळ मोठ्या प्रमाणात दारुगोळा आणि अत्याधुनिक शस्त्रसामग्रीचा साठा आहे.परंतु जर तो देश साक्षर नसेल तर काय फायदा!असे देश मागासल्यामध्ये गणल्या जातात.आज पाकिस्तान फक्त ३० टक्के साक्षर आहे.त्यामुळे तो गेल्या ७९ वर्षाच्या काळात तो कवडीचीही प्रगती करू शकला नाही.पाकिस्तानने फक्त आतंकवाद्यांना खतपाणी घालण्याचे काम केले व आताही करीत आहे व याचा परिणाम आज संपूर्ण पाकिस्तान रक्ताच्या लाथोळ्यात लथफतलेला दिसून येतो.त्यामुळेच आज पाकिस्तानाच्या हातात भिकेचे ढोबर दिसून येते व आजच्या परिस्थितीत पाकिस्तान जगातील आतंकवाद्यांचे माहेरघर बनले आहे. जगातील प्रत्येक देशांनी ८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून प्रत्येक देशांनी साक्षरता अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. यामुळे देश प्रगतीपथावर येईल.आजच्या यांत्रिकी युगात युवावर्ग मोबाईलमध्ये गर्क असतो.त्यामुळे नवीन नवीन अनेक व्याधी निर्माण होवू शकते याला नाकारता येत नाही.याकरिता साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून मोबाईल पासून होणाऱ्या नुकसानाबद्दल सूध्दा जागृती करणे आज गरजेचे आहे.आज स्वीडनमध्ये दोन वर्षांखालील मुलांना मोबाइल, टीव्ही पाहण्यास बंदी घालण्यात आली आहे.देशाच्या सार्वजनिक आरोग्य संस्थेच्या मते स्क्रीनचा वापर शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम करत असल्याने लहान मुलांना डिजिटल मीडिया आणि टेलिव्हिजनपासुन पूर्णपणे दूर ठेवले पाहिजे.हा संपूर्ण परीणाम साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येते.साक्षरता म्हणजे फक्त शिक्षण नसुन आपुलकी, खान-पाण, रहाणीमान,देशाचा विकास, पारिवारिक सुख-दु:ख,सुविधा,परिपक्वता,संस्कृती,आरोग याची काळजी,अति दुर्गम भागातील विकास,सोशल मिडियापासुन लहान मुलांवर होणारे दुष्परिणाम ह्या संपूर्णबाबी साक्षरतेमध्ये मोडत असतात.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसलेले आहे. त्यामुळे पृथ्वी नष्ट व्हायला काहीच वेळ लागणार नाही. आज जगात महाप्रलय, भुकंप, सुनामी, अतिउष्णता,भुस्खलन ,अतिथंडी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण विनाशकारी घटना मानवाने स्वतः हून ओढवल्या आहेत. जगात सध्याच्या परिस्थितीत जंगलतोड व हिमालयातील विकासकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहे यामुळे पृथ्वीतलावरील सर्वांचा जीव धोकादायक स्थितीमध्ये आल्याचे दिसून येते. ह्या सुध्दा साक्षरतेच्या अभावामुळेच निर्माण झालेल्या समस्या आहेत. आंतराष्ट्रीय साक्षरता दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात साक्षरता अभियान छेडुन मानवजाती, जिवजंतु, पर्यावरण व निसर्ग यांना वाचविले पाहिजे.कारण मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे तो स्वतःच्या स्वार्थासाठी कोणत्याही स्तरावर जात असतो अशा परिस्थितीत तो मागचा-पुढचा कुठलाही विचार करीत नाही व याचा दुष्परिणाम संपूर्ण मानवजातीला व जीवसृष्टीला भोगावा लागतो. ह्या संपूर्ण बाबी साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झाल्याचे दिसून येतो.त्यामुळे साक्षरतेमध्ये सर्वच स्तरातून विचार व्हायला हवा.म्याझॉनसारखे जंगल जळने,वनवे लागले, महाप्रलय येणे हे सर्व साक्षरतेच्या अभावामुळे निर्माण झालेली परिस्थिती आहे असे मला वाटते. निसर्गाचे वाटोळे मानवाने केले,जंगल संपदा मानवाने नष्ट केली,हिमालयात सुरूंग लावण्याचे काम मानवाने केले व नवीन-नवीन समस्या मानवाने निर्माण केल्या यामुळेच आज पृथ्वीचे संतुलन डगमगले आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी पृथ्वीच्या पोटातील संपूर्ण पाणी निचोडुन टाकले यामुळेच आज अनेक देश पीण्याच्या पाण्यासाठी रेडझोनमध्ये आल्याचे दिसून येते.याला साक्षरतेच्या माध्यमातून जनजागृती करून वाचविले पाहिजे.याकरिता जगातील प्रत्येक देशांना युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.आज प्रत्येक देश युद्धासाठी सज्ज आहे त्यापध्दतीने प्रत्येक देशांनी आपली तयारी केली आहे.म्हणजे जग आज तिसऱ्या महायुध्दाच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचले आहे.याला साक्षरता अभियानाच्या माध्यमातून थांबविले पाहिजे. जगातील प्रत्येक देशांनी प्रगती अवश्य करावी.परंतु मानवजातीच्या कल्याणासाठी व जे निसर्गाच्या सानिध्यात रहातात (पशुपक्षी,वण्यप्राणी)त्यांच्यावर कोणताही प्रकारचा अन्याय होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे. यातच आपल्या खरा आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस दिसून येईल. चारित्र्य बनविण्यासाठी, चांगलेव्यक्तीत्व निर्माण करण्यासाठी जो कोणी प्रयत्न करेल तोच खरा साक्षरतेचा भागीदार आहे.८ सप्टेंबर आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवसाचे औचित्य साधून जगभरातील प्रत्येक देशांनी साक्षरता अभियानासोबत बदलत्या हवामानावर मात करण्यासाठी वृक्षलागवड अभियान युध्दपातळीवर चालवायला पाहिजे. १९६५ मध्ये ८ ते १९ सप्टेंबर दरम्यान इराणची राजधानी तेहरान येथे जगभरातील शिक्षणमंत्र्यांची एक बैठक झाली. यानंतर १९६६ साली संयुक्त राष्ट्रसंघाने शिक्षणप्रणालीमध्ये जागरूकता वाढावी याउद्देशाने ८ सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. तेव्हापासुन जगभरात ८ सप्टेंबरला दरवर्षी साक्षरता दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. म्हणजेच देशाची प्रगती असो वा स्वतःची प्रगती असो शिक्षण अत्यंत महत्त्वाचे असते.हाच उद्देश साक्षरतेचा आहे.कारण यातुनच आयुष्याची जडणघडण निर्माण होते व मन्युष्य घडतो.आज अनेक देश प्रगतीपथावर आहेत.परंतु आफ्रिका आणि आशिया खंडात साक्षरतेचे प्रमाण कमी दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे अशिक्षितपणा, बेरोजगारी,भुकमरी, कुपोषण व जंगली जीवन आहे.आजही भारत पुर्णपणे साक्षर नाही.याकरीता सरकारला मोठे अभियान चालविण्याची गरज आहे.भारत सध्याच्या परिस्थितीत फक्त ७० टक्के साक्षर आहे.देशात साक्षरतेच्या अभावामुळेच शेतकऱ्यांच्या आत्महत्यां होत आहे.त्या थांबविण्याचा संकल्प ८ सप्टेंबरला घेऊन साक्षरता अभियान युध्दपातळीवर व्हायला पाहिजे.कारण बदलत्या काळानुसार १०० टक्के साक्षर होणे गरजेचे आहे.भारतातील केरळ हे असे एकमेव राज्य आहे की ते १०० टक्के साक्षर आहे.

# साक्षरता : देशात कोणीही निरक्षर राहता कामा नये




साक्षरता केवळ वाचन-लेखन यापुरती मर्यादित नाही, तर ती व्यक्तीच्या विचारक्षमतेचा, आत्मविश्वासाचा आणि समाजातील सहभागाचा आधार आहे. साक्षर लोक स्वतःच्या आणि आपल्या कुटुंबाच्या जीवनात अधिक सकारात्मक बदल घडवू शकतात. आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाच्या निमित्ताने, आपण सर्वांनी शिक्षणाच्या महत्त्वाची जाणीव ठेवून, समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी एकत्र येऊन प्रयत्न करणे गरजेचे आहे. शिक्षण आणि साक्षरता यामुळेच आपला समाज खऱ्या अर्थाने समृद्ध आणि प्रगतिशील होऊ शकतो.

साक्षरता म्हणजे काय? मूळ अर्थ: केवळ सही करता येणे किंवा अक्षरांची ओळख असणे म्हणजे साक्षरता नव्हे, तर ज्ञानार्जनासाठी लिपीचा वापर करण्याची कार्यक्षमता म्हणजे साक्षरता होय. भारतात सात वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाची व्यक्ती किमान एका भाषेत लिहू, वाचू आणि बोलू शकत असेल तर त्याला साक्षर मानले जाते. साक्षरता म्हणजे एखाद्या व्यक्तीला कोणतीही एक भाषा लिहिता, वाचता आणि समजता येण्याची क्षमता होय.

साक्षरतेचे महत्त्व व व्यक्तिमत्त्व विकास: साक्षरतेमुळे व्यक्तीचा आत्मविश्वास वाढतो आणि योग्य-अयोग्य समजण्याची क्षमता विकसित होते.प्रगतीचा मार्ग: निरक्षरता हा देशाच्या आणि राज्याच्या प्रगतीमधील मोठा अडथळा आहे. साक्षर समाजामुळे देश आर्थिक व सामाजिक दृष्ट्या प्रगत होतो.जीवन कौशल्ये: साक्षरतेमध्ये आता डिजिटल साक्षरता, आर्थिक साक्षरता आणि आरोग्याची जागरूकता यांचाही समावेश होतो.

निरक्षरतेमागील कारणे: देशाचा मोठा भाग अजूनही निरक्षरतेशी झुंजत आहे. अशा परिस्थितीत निरक्षरतेमागील कारण काय आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे:- १) कौटुंबिक मानसिकता: कौटुंबिक मानसिकता हे निरक्षरतेचे सर्वात मोठे कारण बनते कारण अजूनही भारतातील अनेक भागात असे पालक आहेत जे त्यांच्या सनातनी विचारसरणीने त्रस्त आहेत. ते अभ्यासाला व्यर्थ मानतात आणि त्याऐवजी मुलांना कामावर आणण्याला महत्त्व देतात. बहुतेक मुलींच्या बाबतीत असे घडते ज्यांच्या पालकांना वाटते की मुली अधिक शिकल्या तर हाताबाहेर जातील. २) पालकांची निरक्षरता: बरेच पालक स्वतः निरक्षर आहेत, त्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व इतके चांगले समजत नाही आणि ज्या पालकांना आपल्या मुलांना शिक्षण द्यायचे असेल त्यांना हे देखील माहित नसेल की कृपया मुलांचे प्रवेश आणि इतर प्रक्रिया काय कराव्यात, कारण जे ते मुलांना शिकवू शकत नाहीत. ३) कौटुंबिक पाठिंब्याचा अभाव: अनेक मुलांना शिक्षण घ्यायचे असते परंतु पुरेशा कौटुंबिक पाठिंब्याअभावी ते त्यांचा अभ्यास पूर्ण करू शकत नाहीत. ४) गरिबी:- गरिबी हे निरक्षरतेचे एक मोठे कारण आहे, कारण अनेक पालक गरिबीमुळे आपल्या मुलांना शिक्षण देऊ शकत नाहीत. त्यामुळे निरक्षरतेच्या कारणांकडे लक्ष देऊन ते दूर करण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. साक्षरता वाढवण्याचे मार्ग: देशभरात साक्षरता पसरवण्यासाठी विविध पद्धती अस्तित्वात आहेत, यापैकी बहुतांश पद्धती सरकार आणि विविध स्वयंसेवी संस्थांनी वापरल्या आहेत. साक्षरतेला चालना देण्यासाठी खालील काही मार्ग आहेत:- १) मोफत शिक्षण:- देशात असे अनेक लोक आहेत जे गरिबीमुळे शाळेची फी भरू शकत नाहीत आणि आपल्या मुलांना या शाळांमध्ये दाखल करू शकत नाहीत. त्यामुळे मुलांना मोफत शिक्षण देण्याची गरज आहे. याच भागात, सन १९९३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ''उन्नीकृष्णन निकाला''मध्ये १४ वर्षांपर्यंतच्या मुलांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा संविधानाच्या कलम २१ अन्वये मूलभूत अधिकार म्हणून दिला. त्यानंतर सन २००३ मध्ये संविधानातील शिक्षणाच्या अधिकारांतर्गत मोफत शिक्षण देण्यात येऊ लागले. २ जागरूकता:- सतत शिक्षणाविषयी जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाने अनेक सरकारी, गैर-सरकारी आणि स्थानिक संस्थांद्वारे अनेक मोहिमा चालवल्या जातात. या मोहिमांचा फायदा असा आहे की ते आपल्या मुलांना शाळेत का पाठवणे महत्त्वाचे आहे याबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करतात. जनजागृतीतूनच शिक्षणाचे महत्त्व प्रत्येकाच्या मनात बिंबवले जाऊ शकते, म्हणूनच या जनजागृती मोहिमा वाढवणे आवश्यक आहे. ३) शिष्यवृत्ती:- शिष्यवृत्ती, अनुदान आणि अनुदानासारख्या योजना गरीब कुटुंबातील किंवा अत्यंत मागासलेल्या जातीतील मुलांसाठी लागू कराव्यात, कारण या योजनांमुळे मुलांना अधिक अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळेल. मात्र सध्या अशा अनेक योजना राबविल्या जात आहेत. मात्र खराब व्यवस्थेमुळे अनेक विद्यार्थ्यांना या सुविधांचा लाभ मिळत नाही. ४) मोफत पुस्तके :- मुलांमध्ये शिकण्यास प्रोत्साहन देण्यासाठी शाळांनी मोफत पुस्तकांचे वाटप करणे आवश्यक आहे. तसे, तर या सेवेचा लाभ सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे. सरकारी शाळेतील मुलांना इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत मोफत पुस्तके दिली जातात, त्यानंतर त्यांना स्वतः पुस्तके खरेदी करावी लागतात. मात्र, खासगी शाळांमधील मुलांना ही सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे हे मुद्दे लक्षात घेऊन सरकारने धोरणे राबवली, तर देशात एकही मूल निरक्षर राहणार नाही, असे आपण म्हणू शकतो.

जागतिक साक्षरता दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर निरक्षरता निर्मूलनाच्या उद्देशाने एक मोहीम राबविण्यात आली, जी आज आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस म्हणून आपल्यासमोर आहे. वास्तविक, युनेस्कोने सन १९६६ मध्ये याची सुरुवात केली होती, त्याचा उद्देश असा होता की सन १९९० पर्यंत कोणत्याही देशात कोणीही निरक्षर राहू नये. ही मोहीम सन १९९५ पर्यंत मागासलेल्या देशांमध्ये (भारताचाही यात समावेश आहे) राबविण्यात आली. लोकांचे प्रबोधन करण्याचा हा प्रयत्न स्तुत्य होता.

निष्कर्ष: लोकांना शिक्षित करण्यासाठी सरकारला अनेक नवीन नियम आणि योजना प्रकाशात आणाव्या लागतील. शासनाव्यतिरिक्त प्रत्येक सुशिक्षित नागरिक आपल्या स्तरावर लोकांना शिक्षण देऊ शकत असला, तरी विविध सरकारी आणि निमसरकारी संस्थांकडून शिक्षणासाठी मोहिमा राबवल्या जातात. मात्र या मोहिमांना गती देण्याची गरज आहे. लहानपणापासूनच मुलांमध्ये शिक्षणाची सवय लावण्यासाठी त्यांच्या सुरुवातीच्या शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे. आज अशा अनेक सरकारी शाळा आणि महाविद्यालये उपलब्ध आहेत जिथे मुलांना मोफत शिक्षण दिले जाते. लोकही त्यांचा लाभ घेऊ शकतात. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

**!! आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनाच्या समस्त जनतेला हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!**

# ऑफलाईन, अनधिकृत प्रवेश देणाऱ्या महाविद्यालयांवर होणार कारवाई; इयत्ता ११ वीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्याचे शिक्षण संचालनालयाचे निर्देश

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णयानुसार २०२५-२६ पासून राज्यातील उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमधील इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रणालीद्वारे करण्यात येत आहेत. या प्रक्रियेचे काटेकोर पालन करण्याबाबत शिक्षण उपसंचालकांना निर्देश देण्यात आले आहेत. काही कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये मंजूर क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना ऑफलाईन पद्धतीने प्रवेश दिले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. अशा विद्यार्थ्यांना पुढे इयत्ता १२ वीच्या राज्य मंडळाच्या अर्ज प्रक्रियेदरम्यान अडचणी निर्माण होतात. तसेच प्रवेश नियमित न झाल्यास विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची शक्यता असते. यामुळे कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयाने ऑफलाईन पद्धतीने प्रवेश देऊ नयेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या सूचनांचे उल्लंघन झाल्याचे आढळल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालय तसेच मुख्याध्यापकांविरुद्ध महाराष्ट्र कर्मचारी खासगी शाळा (सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९७७ व नियमावली, १९८१ मधील तरतुदींनुसार कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशारा शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी दिला आहे.

# आयटीआय'च्या नामांतर प्रक्रियेतून पालकमंत्र्यांना वगळले; मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्याकडे एकाधिकार



मुंबई : राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तांत्रिक विद्यालयांच्या नामांतरासाठी संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांसोबत विचार विनिमय करण्याची तरतूद रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे आता नामांतराच्या प्रस्तावावर निर्णय घेण्याचे सर्वाधिकार हे या विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या एकादस्यीय समितीकडे असणार आहेत राज्याच्या कौशल्य विकास विभागाने सोमवारी शासन निर्णय जारी करत नामांतराचे सर्वाधिकार विभागाच्या मंत्र्यांकडे राहतील, अशी व्यवस्था केली आहे. राज्यातील शासकीय आयटीआयच्या नावात बदल करण्यासाठी कौशल्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एकसदस्यीय समिती गठित करण्यात आली होती. या समितीने नामांतराचा निर्णय घेताना संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांशी विचारविनिमय करावा, अशी तरतूद करण्यात आली होती.

# अभियानाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य; शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे



मुंबई : राज्यातील शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य आहे. त्याचबरोबर शाळांमधून भौतिक सुविधा, संस्कार आणि राष्ट्रभक्तीची जपणूक यासाठी 'चला शाळेत जाऊया' हे व्यापक अभियान लोकचळवळीच्या स्वरूपात राबविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केले. या अभियानाच्या माध्यमातून शालेय शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी सर्व शाळांना ८ आणि ९ सप्टेंबर, २२ आणि २३ सप्टेंबर तसेच ७ आणि ८ ऑक्टोबर रोजी भेट देणार आहेत. यासाठी अधिकाऱ्यांना जिल्ह्यांचे पालकत्व नेमून देण्यात आले असल्याची माहिती त्यांनी दिली. शालेय शिक्षण क्षेत्रातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांसमवेत महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेच्या कार्यालयात सोमवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीनंतर मंत्री भुसे यांनी माध्यम प्रतिनिधींसमवेत संवाद साधताना अभियानाबाबत सविस्तर माहिती दिली. या बैठकीस आमदार विक्रम काळे, किरण सरनाईक, जयंत आसगावकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, महेंद्र दळवी, विभागाचे प्रधान सचिव रंजीत सिंह देओल, आयुक्त सचिंद्रप्रताप सिंह यांच्यासह विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत संघटनांच्या प्रतिनिधींनी शिक्षण क्षेत्राशी संबंधित प्रश्न, मागण्या आणि सूचना मांडल्या. मंत्री भुसे म्हणाले, शालेय शिक्षण विभागाशी संबंधित विविध संघटनांच्या मागण्या आणि सूचनांवर सकारात्मक दृष्टिकोनातून कार्यवाही करण्यात येणार असून, प्रलंबित प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्यासाठी विभाग कटिबद्ध आहे. संघटनांकडून प्राप्त झालेल्या निवेदनांमधील अनेक विषयांवर विभागाने आधीच कार्यवाही केली असून उर्वरित विषयांवरही सकारात्मक विचार सुरू आहे. काही विषय तात्काळ मार्गी लावता येतील, तर आर्थिक किंवा धोरणात्मक स्वरूपाच्या बाबींसाठी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करण्यात येईल. सर्व संघटनांशी सविस्तर संवाद साधण्यासाठी येत्या काही आठवड्यांत पुणे येथे व्यापक बैठक आयोजित करण्यात येणार असून त्यामध्ये सर्व प्रश्नांवर सखोल चर्चा केली जाईल. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अमृतकालीन संकल्पनांचा विचार करून शालेय शिक्षण विभागाने 'चला शाळेत जाऊया' हे अभियान हाती घेतले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनानुसार शाळांमधील अपूर्ण सुविधा पूर्ण करण्यासाठी जिल्हा नियोजन समिती (उ्झऊउ) निधीचा वापर वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या योजना, लोकसहभाग, सीएसआर निधी आणि आकांक्षित तालुक्यांसाठी उपलब्ध विशेष निधी यांचा प्रभावी समन्वय साधून शाळांचा विकास साधला जाणार आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण हा विभागाचा केंद्रबिंदू असून विद्यार्थ्यांची वाचन, लेखन आणि आकलन क्षमता वाढविणे, मराठी शाळांबाबत समाजाचा विश्वास दृढ करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये गुणवत्तेची नवी उंची गाठणे यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. राज्यातील अनेक शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समित्या समाजाच्या सहभागातून उल्लेखनीय काम करत असल्याचे सांगत मंत्री भुसे यांनी अशा सकारात्मक उपक्रमांचे कौतुक केले. काही शाळांनी ग्रामस्थ, माजी विद्यार्थी आणि उद्योग समूहांच्या सीएसआर निधीच्या मदतीने शाळांचे रूपांतर केले असून अशा आदर्श उपक्रमांचा राज्यभर प्रसार करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. आकांक्षित जिल्ह्यांचे नोडल अधिकारी पुढीलप्रमाणे : राज्याच्या संतुलित, सर्वांगिण विकासासाठी १० जिल्ह्यांची विस्तारित आकांक्षित जिल्हे म्हणून निवड करण्यात आली आहे. यातील जालना जिल्ह्यासाठी प्रधान सचिव, गडचिरोली जिल्ह्यासाठी शालेय शिक्षण आयुक्त, पालघर जिल्ह्यासाठी महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक, परभणी जिल्ह्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक, बीड साठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे अध्यक्ष, नंदुरबार साठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष, वाशिम साठी शिक्षण संचालक (झीळारीू), धाराशिव साठी शिक्षण संचालक (ड्शलेपवरीू रपव क्ळसहशी ड्शलेपवरीू), धुळे साठी शिक्षण संचालक (ड्लहशाश) आणि हिंगोली जिल्ह्यासाठी संचालक (इरश्रलहरीरींळ) हे पालक अधिकारी म्हणून काम पाहतील.

या व्यतिरिक्त सर्व जिल्हानिहाय नोडल अधिकाऱ्यांची स्वतंत्र नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी संबंधित विभागाचे विभागीय अध्यक्ष हे संनियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील. ते दर १५ दिवसांनी कामांचा आढावा घेऊन शिक्षण आयुक्तालयास अहवाल सादर करतील, अशी माहिती मंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# मंठा येथे स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मोफत महा-आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

मंठा/ प्रतिनिधी :- हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) मंठा तालुका व लोककल्याण आरोग्य केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने देवगांव खवणे व मंठा(ता. मंठा, जि. जालना) येथे आयोजित भव्य मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिर उत्साहात संपन्न झाले. बाळासाहेबांचा ८०% समाजकारण आणि २०% राजकारण हा विचार प्रत्यक्ष कृतीत आणत या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

✻शिबिराची वैशिष्ट्ये:✻





- अनुभवी तज्ञ डॉक्टरांच्या पथकाकडून रक्तदाब (BP), मधुमेह (Sugar), हृदयरोग व सर्वसाधारण आरोग्याची सखोल तपासणी करण्यात आली. - नेत्र तपासणी शिबिरात विशेषतः ज्येष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मोतीबिंदू, दृष्टीदोषाची तपासणी करून गरजू रुग्णांना मोफत चष्मे व औषधांचे वाटप करण्यात आले. - गावासह पंचक्रोशीतील शेकडो नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेतला. या प्रसंगी उपजिल्हाप्रमुख श्री. माधवराव मामा कदम, जिल्हा समन्वयक श्री. अनंतराव वैद्य, युवा सेना जिल्हा प्रमुख श्री गणेश काळे, मंठा तालुका प्रमुख श्री डिगांबर बोराडे, उप तालुका प्रमुख श्री भागवत चव्हाण, शहर प्रमुख श्री गोपी गायकवाड,

यांच्यासह शिवसेना व युवा सेना पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा हा केवळ राजकारणा पुरता मर्यादित नसून तो रुग्णसेवा आणि समाजसेवेचा आहे. जन्मशताब्दी वर्षानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात असे सामाजिक उपक्रम राबवून बाळासाहेबांना खरी आदरांजली वाहण्याचा आमचा प्रयत्न आहे. या सामाजिक उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून शिबिर यशस्वी करण्यासाठी मंठा तालुका शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सोनलनगरमध्ये शिक्षकांचा गौरव; श्री संत गजानन महाराज संस्थानचा स्तुत्य उपक्रम

जालना : जालना : शिक्षक दिनाचे औचित्य साधून सोनलनगर येथील श्री संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने दिनाक ६ सप्टेंबर २६ वार रविवार रोजी परिसरातील शिक्षकांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. शिक्षकांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या उपक्रमाचे मुख्य प्रायोजक समर्थ सहकारी बँक मर्यादित, जालना होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड. रविंद्र डुरे होते. प्रमुख अतिथी म्हणून एम.जी. जोशी सर, रवी जोशी सर, सुचित कुलकर्णी, शिवाजी उबाळे व डॉ. मकरंद बोठे उपस्थित होते. यावेळी तुकाराम काकडे सर यांनी '-ख ची गरज व



## 'AI ची गरज, मातृभाषेतील शिक्षण व इंग्रजीचे महत्त्व' या विषयांवर मार्गदर्शन


वर्तमान', अशोक तोंडे सर यांनी 'मातृभाषेतून शिक्षण', तर अतुल हेलसकर सर यांनी 'इंग्रजी शिकण्याचे महत्त्व' या विषयांवर मार्गदर्शन केले. संस्थानच्या विविध सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांची माहिती प्रमोद नाईक सर यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विशाल तायडे सर यांनी केले. सूत्रसंचालन श्री अनिल झणझणे सर यांनी केले, तर अध्यक्षीय समारोप ड. रविंद्र डुरे यांनी केला. आभार प्रदर्शन डॉ. मकरंद बोठे यांनी केले. ज्ञानदानातून समाज घडविणाऱ्या सोनलनगरातील सर्व शिक्षकांच्या कार्याचा सन्मान करणारा हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# योजनांची प्रभावी अंमलबजावणी

मुंबई : सार्वजनिक आरोग्य विभागात कामगिरीआधारित प्रशासकीय कार्यसंस्कृती रुजविण्याच्या दृष्टीने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हा शल्यचिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांचे दरवर्षी वस्तुनिष्ठ पद्धतीने गुणांकन करण्यात येणार असून, मागील तीन वर्षांतील कामगिरीच्या आधारे त्यांची श्रेणी निश्चित केली जाणार आहे. या श्रेणीचा उपयोग जबाबदाऱ्यांचे वाटप, पुढील तीन वर्षांचे कार्यनियोजन, भविष्यातील नियुक्त्यांच्या वेळी केला जाणार आहे. या निर्णयामुळे सार्वजनिक आरोग्य विभागात सेवाज्येष्ठतेसोबतच प्रत्यक्ष कामगिरी, नेतृत्वक्षमता, रुग्णसेवा, आर्थिक शिस्त, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि योजनांची प्रभावी अंमलबजावणी यांना महत्त्व मिळणार आहे.

# भरती परीक्षांमध्ये मोठ्या सुधारणा होणार?

मुंबई : राज्यातील भरती परीक्षा अधिक सुरक्षित, पारदर्शक, विश्वासार्ह आणि उमेदवाराभिमुख करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. भरती परीक्षा पद्धतीचा सर्वंकष अभ्यास करून आवश्यक सुधारणा सुचविण्यासाठी शासनाने ४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्चस्तरीय टास्क फोर्स गठीत केला आहे. हा टास्क फोर्स राज्यातील सर्व सहा विभागांना प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था आणि अन्य संबंधित हितधारकांशी थेट संवाद साधणार आहे. भरती परीक्षांमध्ये गैरप्रकारांना आळा घालणे, परीक्षा प्रक्रियेची सुरक्षा अधिक मजबूत करणे, परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढवणे तसेच संपूर्ण परीक्षा व्यवस्था उमेदवारांसाठी



अधिक सुलभ आणि उत्तरदायी करण्याच्या दृष्टीने या टास्क फोर्सकडून विविध सूचना आणि अभिप्राय जाणून घेतले जाणार आहेत. या विभागनिहाय भेटींमध्ये विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांना त्यांच्या अडचणी थेट मांडता येणार आहेत. त्याचबरोबर पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था आणि परीक्षा व्यवस्थेशी संबंधित अन्य हितधारकांकडूनही सूचना मागवण्यात आल्या आहेत. परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी, संभाव्य गैरप्रकार, सुरक्षा व्यवस्था, प्रशासनिक अडचणी आणि उमेदवारांना भेडसावणाऱ्या समस्यांबाबत टास्क फोर्सकडून माहिती घेतली जाणार आहे. नागरिक, विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा उमेदवार आणि इतर संबंधित हितधारकांना आपल्या सूचना आणि अभिप्राय संबंधित विभागासाठी देण्यात आलेल्या वरील ई-मेल पत्त्यावर पाठवता येणार आहेत. त्यामुळे परीक्षा प्रक्रियेत प्रत्यक्ष अनुभवलेल्या अडचणी आणि सुधारणांसाठीच्या सूचना शासनापर्यंत पोहोचवण्याची संधी उमेदवारांना मिळणार आहे.

# धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करा सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांना निवेदन; अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

परतुर(प्रतिनिधी) : धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती (ड्ढ) आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकारने तातडीने ठोस भूमिका घेऊन आरक्षणाची अंमलबजावणी करावी, अशी मागणी धनगर समाजाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या प्रश्नावर सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर सरकारने न्यायालयासमोर स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न अनेक दशकांपासून प्रलंबित आहे. समाजाने आपल्या घटनात्मक हक्कासाठी सातत्याने लोकशाही आणि संवैधानिक मार्गाने संघर्ष केला आहे. हा प्रश्न समाजाच्या सामाजिक न्याय, शैक्षणिक व आर्थिक प्रगतीशी निगडित असून शासनाने धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे. सध्या धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाच्या अंमलबजावणीसंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी निर्णायक टप्प्यावर आली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ८ सप्टेंबरपर्यंत राज्य सरकारने आपली ठाम भूमिका



न्यायालयासमोर मांडावी, अशी मागणी करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयात राज्य सरकारने कोणतीही संदिग्ध भूमिका न घेता धनगर समाजाच्या हक्काच्या आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, अशी स्पष्ट आणि ठाम बाजू पूर्ण ताकदीने मांडावी. त्यासाठी आवश्यक कायदेशीर आणि प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. 'प्लॅन-बी' तयार ठेवण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल धनगर समाजाच्या अपेक्षेप्रमाणे न लागल्यास सरकारने पर्यायी 'प्लॅन-बी' तयार ठेवावा. प्रतिकूल निकाल आल्यास धनगर समाजाच्या आरक्षणाची अंमलबजावणी पर्यायी पद्धतीने कशी करता येईल, यासाठी आतापासूनच ठोस कायदेशीर पर्याय तयार करण्याची मागणी निवेदनातूनं करण्यात आली आहे. निश्चित कालमर्यादेत अंमलबजावणी कक्ष आणि राज्य शासनाने आवश्यक समन्वय साधून सर्व कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करावी. धनगर समाजाच्या न्याय्य आणि घटनात्मक हक्कांचा सन्मान राखत शासनाने तातडीने मार्ग काढावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. दरम्यान, सरकारने या प्रश्नावर तात्काळ ठोस पावले उचलली नाहीत आणि धनगर समाजाची मागणी प्रलंबित राहिली, तर तीव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनाच्या शेवटी 'येळकोट येळकोट, जय मल्हार' असा जयघोष करण्यात आला असून समस्त धनगर समाज, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने हे निवेदन सादर करण्यात आले आहे.

# विशाखा राऊत यांचे महापालिका सदस्यत्व अखेर रद्द

मुंबई (विशेष प्रतिनिधी) : दादरमधील प्रभाग क्रमांक १९१च्या नगरसेविका विशाखा राऊत यांचे महापालिका सदस्यत्व अखेर रद्द करण्यात आले. महापालिका सभागृहात महापौर रितू तावडे यांनी राऊत यांचे महापालिका सदस्यत्व रद्द करण्यात येत असल्याची घोषणा केली. त्यामुळे उबाठाच्या आतापर्यंत दोन नगरसेवकांचे महापालिका सदस्यत्व रद्द झाले असून आतापर्यंत मुंबई महापालिकेतील एकूण ५ नगरसेवकांचे सदस्यत्व रद्द झाले आहे. पालघर जातपडताळणी समितीने विशाखा राऊत यांचे जातप्रमाणपत्र अवैध ठरविले. महापालिकेला याबाबतचे पत्र प्राप्त झाल्यानंतर मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी नगरविकास विभाग अपर मुख्य सचिव -२ यांना, विशाखा राऊत यांचे जातप्रमाणपत्र अवैध ठरल्याबाबत पत्र पाठवून माहिती दिली आहे. विशाखा राऊत यांना पुढील सहा वर्षे नगरसेवकपदाची निवडणूक लढविता येणार नसल्याचा उल्लेखही पत्रात करण्यात आला होता. त्यानंतर नगरविकास खात्याने याबाबतची अधिसूचना जारी केली होती. त्यानुसार सोमवारी महापालिका सभागृहात विशाखा राऊत यांचे महापालिका सदस्यत्व रद्द करण्यात येत असल्याची घोषणा महापौर रितू तावडे यांनी केली. २० ऑगस्ट २०२६पासून त्यांचे महापालिका सदस्यत्व रद्द करण्यात येत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. नगरसेविका विशाखा राऊत यांनी, मुंबई महापालिकेच्या २०२५- २६ निवडणुकीत दादर येथील प्रभाग क्र. १९१ मधून माजी आमदार सदा सरवणकर यांच्या कन्या प्रिया सरवणकर यांच्यासमोर ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत बहुमताच्या जोरावर विशाखा राऊत यांनी निवडणूक जिंकली होती. मात्र प्रिया सरवणकर यांनी विशाखा राऊत यांच्या जातप्रमाणपत्राबाबत जात पडताळणी समितीकडे तक्रार करून चौकशीची मागणी केली होती. त्यावेळी,निवडणूक लढवताना विशाखा राऊत यांनी, चैताली जितेंद्र राऊळ, अमृता जितेंद्र राऊळ व विराज जगदीश राऊळ यांचे कुणबी जातीचे वैधता प्रमाणपत्रे सोबत जोडली होती. परंतु सदर जात वैधता प्रमाणपत्र धारकांशी अर्जदाराचे पुराव्यांच्या अभावी रक्तनातेसंबंध सिध्द होऊ शकलेले नाहीत, असे कारण चौकशीनंतर जातपडताळणी समितीने दिले. पालघर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने विशाखा राऊत यांचे जातप्रमाणपत्र अवैध ठरले असल्याचे मुंबई महापालिकेला कळवले होते. यापूर्वी उबाठाचे दिपक सावंत यांचे महापालिका सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. त्यानंतर आता विशाखा राऊत यांचे महापालिका सदस्यत्व रद्द झाले आहेत.तसेच यापूर्वी एमआयएमचे दोन नगरसेवक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे एक अशाप्रकारे एकूण पाच नगरसेवकांचे जातप्रमाणपत्र अवैध ठरल्याने महापालिका सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे.

पान १ व ४ वरुन

## राघवचा वाढदिवस दिव्यांग

व दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत आनंद वाटून घेण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद, संवेदनशील आणि प्रेरणादायी ठरला. या कार्यक्रमास राघव यांच्या आई रूपालीताई शिवाजीराव शिंदे, महेश घनघाव, धोपटेश्वर गावचे संतोषभाऊ वरकड, कैलास कोल्हे (बाप्पू), गजानन दाभाडे, पवन शेरे, भरत कोल्हे, युवराज कोल्हे, ओम कोल्हे तसेच कडुबाभाऊ मित्र मंडळीतील इतर सदस्य उपस्थित होते. उपस्थितांनी राघवला वाढदिवसाच्या शुभेच्छा देत दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत वाढदिवस साजरा करण्याच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.

## मराठवाड्यात कोरडा

शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले असून आगामी काळात पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा आणि पाण्याची समस्या अधिक तीव्र होण्याची शक्यता असल्याकडेही शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने पंचनामे करा मराठवाड्यातील परिस्थितीचा तातडीने वस्तुनिष्ठ आढावा घेऊन कोरडा दुष्काळ जाहीर करावा. नुकसानग्रस्त खरीप पिके, फळबागा व ऊस यांचे तातडीने पंचनामे करून पीक विमा आणि विशेष हेक्टरी आर्थिक मदत द्यावी, अशी प्रमुख मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीक कर्जाच्या वसुलीस स्थगिती देऊन कर्जाचे पुनर्गठन करावे, तसेच ज्या भागात पाणी आणि चाऱ्याची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, तेथे दुष्काळी उपाययोजना तातडीने लागू कराव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी परिस्थितीची तातडीने दखल घेऊन शासनस्तरावर आवश्यक निर्णय घ्यावेत आणि प्रभावी कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना द्यावेत, अशी विनंती आम आदमी पार्टीचे ड. योगेश गुलाबपल्ली व अनिल ढवळे यांनी निवेदनातून केली आहे.

पान १ व ४ वरुन

## शोभायात्रेत भारतीय

समाजकार्य महाविद्यालय, दानकूंवर महिला महाविद्यालय, शिवराज महाविद्यालय, राजकुंवर महाविद्यालय-वाघुळ, मत्स्योदरी महाविद्यालय-अंबड, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, मोरेश्वर महाविद्यालय-भोकरदन, गोदावरी महाविद्यालय-अंबड व डॉ.सुभाषराव ढाकणे महाविद्यालय यासह एकुण १७ संघ सहभागी झाले. दिलीप खिस्ती, विश्वनाथ निळे, योगेश निरफळ यांनी परीक्षण केले. तर नितीन कडून पाटील, डॉ शशिकांत पाटील, डॉ.शरद बोराडे यांनी संयोजन केले. शोभायात्रेसाठी महात्मा फुले, भारतीय ज्ञान परंपरा व वंदेमादरम सार्थ शताब्दी ही थिम देण्यात आली. विशेषतः भारतीय कला संस्कृतीचे महत्व आणि महात्मा फुले-सावित्रीबाई फुले यांचे योगदान या विषयातील फलक लक्षवेधी ठरले. यजमान लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाच्या संघाने भारतीय परंपरे हा देखावा सादर करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. वाजत गाजत शोभायात्रा निघाली. मुख्य मंडपात शोभायात्रेचा समारोप करण्यात आला.

## जिल्ह्यातील २ हजार

सामूहिकरित्या गायिले जाते. त्यामुळे शालेय वातावरणात सकारात्मकता निर्माण होण्यास मदत होत असून, गीतातील मानवतावादी विचार विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी शिक्षकांकडूनही विविध उपक्रम राबविले जात आहेत. शिक्षकांचा सक्रिय सहभाग विद्यार्थ्यांनी एकमेकांना मदत करणे, गरजू मित्रांना सहकार्य करणे, स्वच्छता राखणे, ज्येष्ठांचा सन्मान करणे, निसर्गाची काळजी घेणे तसेच समाजातील सर्व घटकांशी प्रेमाने व आदराने वागणे, या मूल्यांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न या

पान १ व ४ वरुन


उपक्रमातून केला जात आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शाळांपर्यंतही हा उपक्रम प्रभावीपणे पोहोचविण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण, उत्तम संस्कार आणि सामाजिक जाणीव देण्यासाठी भविष्यातही विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी (प्राथमिक) संगिता भागवत यांनी सांगितले. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बाळासाहेब खरात यांनीही या उपक्रमातील विद्यार्थ्यांच्या सहभागाची माहिती दिली.

## राष्ट्रवादी काँग्रेस

परतूर यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या परतूर तालुका उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी परतूर तालुका अध्यक्ष बाबासाहेब गाडगे, इंद्रजित घनवट, नगर सेवक बाबुराव हिवाळे, शाकेर खतीब, वसीम सय्यद, सिद्धू अंभुरे, विष्णू मचाले, नितिन शिंदे, यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले यावेळी नितीन भैय्या जेथलिया यांनी त्यांना पुढील संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थी व युवकांमध्ये पक्षाची विचारधारा, ध्येयधोरणे आणि विकासाची भूमिका पोहोचवून अधिकाधिक विद्यार्थी व युवकांना पक्षाच्या संघटनेशी जोडण्याचे आवाहन त्यांनी केले. परतूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी विद्यार्थी व युवक आघाडीने सक्रियपणे काम करावे, विद्यार्थ्यांचे व युवकांचे प्रश्न शासन व प्रशासनाच्या निदर्शनास आणून देऊन त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने पाठपुरावा करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या नियुक्त्यांमुळे परतूर तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विद्यार्थी व युवक आघाडीला नवी ऊर्जा मिळणार असून, आगामी काळात तालुक्यात संघटनात्मक कामाला अधिक वेग येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# शालेय साहित्य वाटपावर मोठं स्पष्टीकरण; वह्यांबाबतचा दावा फोल

मुंबई (विशेष प्रतिनिधी) : मुंबई महापालिका शाळांमधील मुलांना शालेय वस्तूंचे वाटप हे आयत्या वेळी जेम पोर्टलवरून करण्याचा निर्णय घेत याची निविदा प्रक्रिया महापालिकेने पूर्ण केली. त्यामुळे ही निविदा प्रक्रिया आणि शाळांमध्ये होणारे वाटप याला विलंब होईल अशाप्रकारची जी शंका उपस्थित केली जात होती, तसे न घडता सप्टेंबर महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात मुलांच्या हाती गणवेशासह सर्व साहित्य पडले. त्यामुळे केवळ वह्यातील दोन चार पाने कमी असल्याचा कांगावा करत विरोधी पक्षाने या साहित्य वाटपाला विलंब झाल्याचा आरोप केला. पणया वह्यांची पानेच सभागृहात मोजून दाखवत विरोधकांचा आरोपातील हवाच काढून टाकण्यात आली. मुंबई महापालिकेच्या विरोध पक्षनेत्या किशोरी पेडणेकर यांनी निवेदनाद्वारे शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात झालेला विलंब आणि जेम पोर्टल खरेदीतील गोंधळाबाबत आरोप केला. शालेय वस्तूंचे वाटप मुलांना अद्यापही झालेले नसून शालेय वाटपातील या गंभीर विलंबाला जबाबदार असलेल्या शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची मागणी केली. तसेच जेम पोर्टलद्वारे झालेल्या खरेदीचे आणि वस्तूंच्या निकृष्ट दर्जाचे तात्काळ थर्ड पार्टी ऑडीट करून त्यांचा अहवाल सादर करण्याची मागणी केली. यावर भाजपच्या स्वप्ना म्हात्रे यांनी जेम पोर्टलचा वापर का करण्यात आला आणि यामुळे महापालिकेचे ४५ कोटी रुपये कसे वाचले हे सांगितले. काँग्रेसचे अश्रफ आझमी यांनी मुलांना छत्री मिळालेली नसून पाण्याची बॉटल्स गळत असल्याचा आरोप केला तसेच मुलांच्या मापाचे बूट नसल्याचा आरोप केला. यावर स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी या सभागृहात वाटप करण्यात आलेली सर्व साहित्य ठेवण्यात यावी त्यातील निकृष्ट दर्जाची कोणती आहे हे त्यांनी दाखवावे. तसेच आतापर्यंत किती साहित्याचे वाटप झाले याची माहिती देत हा फेक नॅरेटिव्ह आहे की फेल नॅरेटिव्ह आहे हे दाखवून दिले जावे अशी सूचना केली.(इचउ ड्लहेश्र घळीं) तर शिक्षण समिती अध्यक्षा राजेश्री शिरवडकर यांनी या नव्या पद्धतीच्या अभावामुळे कंत्राटांमध्ये गैरप्रकार होत होते, हे सर्वांनाच माहिती आहे. आम्हाला या महापालिकेतील सत्तेत येऊन केवळ सहा महिने झाले आहेत; मात्र यापूर्वी तब्बल २५ वर्षे कोणाची सत्ता होती आणि त्या काळात कंत्राटे कोणाबरोबर व कशा पद्धतीने दिली जात होती, हे तुम्हालाही माहिती आहे आणि आम्हालाही माहिती आहे. त्यामुळेच कंत्राटी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी 'जेएन पोर्टल'चा विषय आम्ही





पुढे आणला आहे. ही नवीन पद्धत आहे. नवीन पद्धतीमध्ये काही त्रुटी असू शकतात; मात्र जोपर्यंत आपण बदल करणार नाही, तोपर्यंत त्या त्रुटी आपल्याला कशा समजणार? कदाचित काही ठिकाणी कंत्राटदारांकडून चुका किंवा त्रुटी झाल्या असतील. त्यावर आपण दुरुस्ती करू शकतो, संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाईही करू शकतो. मात्र, आम्ही कोणत्याही कंत्राटदाराची पाठराखण करण्यासाठी येथे बसलेलो नाही. जर ही व्यवस्था इतकीच चुकीची होती, तर गेल्या २५ वर्षांत ती सुधारण्याचा प्रयत्न का झाला नाही? तुमचेच ब्रीदवाक्य होते की, 'आम्ही करून दाखवले, आम्ही हे करून दाखवले, आम्ही ते करून दाखवले.' मग या व्यवस्थेत सुधारणा का करून दाखवली नाही असा सवाल केला. यशवंत किल्लेदार यांनी वह्या वाटपात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला.यावेळी झालेल्या चर्चेत अंकित प्रभू, प्रकाश दरेकर,सिध्दार्थ शर्मा आदींनी चर्चेत भाग घेतला. यावर उत्तर देताना अतिरिक्त आयुक्त विपीन शर्मा यांनी या शालेय वस्तूंच्या खरेदीची प्रक्रिया पूर्ण झाली होती आणि प्रस्तावही तयार होता. पण ही खरेदी जेम पोर्टलद्वारे करून याची निविदा प्रक्रिया पूर्ण करून आतापर्यंत या वस्तूंचे वाटप जवळपास पूर्ण झाले आहे. केवळ छत्रीचे वाटप पूर्ण होवू शकले नाही. पण इतर साहित्यांचे वाटप झालेले आहे. तसेच मापाचे बूट नसतील तर बदलून दिले जातील, बॉटल्समधून पाणी गळत असेल तर तेही बदलून दिले जातील. तसेच जो कंत्राटदार उशिराने साहित्याचे वाटप करेल त्यांना दर आठवड्याला ०.५ टक्के दंड आकारला जातो. त्यानुसार नियमानुसार दंड आकारला जाणार आहे. यापूर्वी सप्टेंबर आणि जानेवारी महिन्यापर्यंत साहित्याचे वाटप झाले होते. छत्री दोन वर्षांतून एकदा दिली जाते. त्यातील काही छत्रीचे वाटप झाले आहे आणि छत्रीबाबत दरवर्षी ही अडचण असते. पण रेनकोटचे वाटप १०० टक्के झाले असल्याचे त्यांनी सांगितले

# जिल्ह्यातील २ हजार शाळांमध्ये ३ लाख विद्यार्थ्यांचे सामूहिक प्रार्थना गीत

जालना : विद्यार्थ्यांमध्ये मानवता, संवेदनशीलता, परस्पर प्रेम, सहकार्य, सामाजिक बांधिलकी आणि चांगले संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने जालना जिल्ह्यातील शाळांमध्ये 'हीच आमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे' हे प्रार्थना गीत नियमितपणे गायिले जात आहे. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कृष्ण कांत कनवारिया यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या उपक्रमात जिल्ह्यातील २ हजार ३६१शाळांमधील ३ लाख ४६ हजार ३४० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. जिल्ह्यात जिल्हा परिषद, नगरपालिका तसेच विविध व्यवस्थापनांच्या एकूण २ हजार ४४४ शाळा आहेत. त्यापैकी २ हजार ३६१ शाळांमध्ये हे प्रार्थना गीत विद्यार्थ्यांकडून सामूहिकरित्या गायिले जात आहे. जिल्ह्यातील एकूण विद्यार्थी संख्या ३ लाख ७६ हजार २९४ असून, त्यापैकी सुमारे ९२ टक्के विद्यार्थ्यांपर्यंत या उपक्रमाचा



संदेश पोहोचला आहे. प्रार्थनेतून मूल्यशिक्षणावर भर 'हीच आमुची प्रार्थना अन् हेच अमुचे मागणे' या गीताच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात माणुसकी, बंधुभाव, प्रेम, सहकार्य, संवेदनशीलता आणि समाजाप्रती असलेली जबाबदारी यांसारख्या मूल्यांची रुजवणूक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शालेय जीवनात मिळालेले संस्कार विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने पुस्तकी ज्ञानासोबतच मूल्याधारित आणि संस्कारक्षम शिक्षण देण्यावर भर देण्यात येत आहे. दररोज सकाळी शाळेच्या प्रार्थनेच्या वेळी विद्यार्थ्यांकडून हे गीत (पान ३ वर)

## बौ.सुमनबाई पांडुरंग म्हस्के यांच्या प्रथम पुण्यानुमोदनानिमित्त आज देवमुर्ती येथे धम्मदेसना

जालना : कालकथित सुमनबाई पांडुरंग म्हस्के यांच्या प्रथम पुण्यानुमोदनानिमित्त म्हस्के व जाधव परिवाराच्या वतीने देवमुर्ती येथे मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता विशेष धम्मदेसना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास पूज्य भिक्खु करुणानंद महाथेरो यांच्यासह भिक्खुसंघाची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या निमित्ताने पूज्य भिक्खु करुणानंद महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मदेसना आयोजित करण्यात आली असून, पूज्य भिक्खु शिवली अगुलीमाल शाक्यपुत्र थेरो, पूज्य भिक्खु राजरत्न थेरो,



पूज्य भिक्खु रैवत, पूज्य भिक्खु मोग्गलायन तसेच मंगलबोधी श्रामणेर यांची उपस्थिती राहणार आहे. प्रथम पुण्यानुमोदनाच्या निमित्ताने धम्मदेसनेसह भोजनदान, संघदान आणि चिवरदानाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे. म्हस्के व जाधव परिवाराच्या वतीने हा धार्मिक व सामाजिक उपक्रम श्रद्धेने पार पाडण्यात येणार आहे.



बौद्ध उपासक-उपासिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धम्मदेसनेचा लाभ घ्यावा, तसेच भोजनदान, संघदान व चिवरदानाच्या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन पांडुरंग नाथाजी म्हस्के, उषा रवि म्हस्के, जयश्री मिलिंद म्हस्के आणि सुरेखा सुनील जाधव यांच्यासह म्हस्के व जाधव परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## अंबड येथे वंचित बहुजन आघाडीची संघटनात्मक आढावा बैठक संपन्न

**जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात यांच्या अध्यक्षतेखाली संघटन बांधणीवर चर्चा; तालुक्यातील पदाधिकाऱ्यांची उपस्थिती**

अंबड, प्रतिनिधी : वंचित बहुजन आघाडीची अंबड येथे संघटनात्मक आढावा बैठक जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात सर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीत तालुक्यातील पक्ष संघटनेचा आढावा घेण्यासह आगामी काळात संघटना अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तालुका आणि स्थानिक पातळीवर पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक सक्षम करणे, पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये समन्वय वाढविणे तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी सक्रियपणे काम करण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात यांनी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत संघटनात्मक कामकाजाचा आढावा घेतला.





याप्रसंगी तालुकाध्यक्ष किशोर तुपे, सतिश खरात, शेख जमिर, परमेश्वर खरात, आशाताई गाडेकर, गौतम खंडागळे, किशोर जाधव, सुभाष ससाने, शेषराव शिनगारे, आप्पासाहेब झाकने, गणेश जाधव, अशोक साळवे, बलभिम ठोंबरे, विठ्ठल शेळके यांच्यासह अंबड तालुक्यातील वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीमुळे पक्षाच्या स्थानिक संघटनात्मक कामाला अधिक गती मिळणार असून आगामी काळात तालुक्यात पक्षाची ताकद वाढविण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सक्रिय राहावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# दशा समजली की बदलेल दशा; वादविवाद स्पर्धेत तरुणाईचे मंथन

जालना जिल्हा युवा महोत्सवात 'तरुणाईची ऊर्जा दिशा की दशा' या विषयावर वाद-विवाद स्पर्धा संपन्न झाली. एकूण ६० संघांनी व्यासपीठ गाजवले. जिल्हा युवक महोत्सवात आयोजित वादविवाद स्पर्धेने आज वैचारिक पातळीवर एक वेगळीच उंची गाठली. 'तरुणाईची ऊर्जा : दिशा की दशा?' या विषयावर जिल्ह्यातील निवडक संघांमध्ये अटीतटीची लढत झाली. या स्पर्धेत एकाच संघातील दोन विद्यार्थ्यांपैकी एकाने विषयाच्या बाजूने (दिशा) तर दुसऱ्याने विषयाच्या विरोधी बाजूने (दशा) आपले मत मांडले. बाबासाहेब आकात सभागृहात सोमवारी दिवसभर ही स्पर्धा चालली. संघ क्रमांक १: 'दिशा' आणि 'दशा'चे अभ्यासपूर्ण सादरीकरण बाजूने (दिशा): या वक्त्याने सांगितले की, आजचा तरुण माहिती तंत्रज्ञान (खढ) आणि डिजिटल क्रांतीच्या जोरावर जगावर राज्य करत आहे. योग्य दिशा मिळाल्यामुळे ग्रामीण भागातील मुलेही आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकत आहेत. विरोधी (दशा): तर याच संघातील दुसऱ्या वक्त्याने वाढत्या बेरोजगारीकडे बोट दाखवले. हातात पदव्या असूनही तरुणांना नोकऱ्या नाहीत, ज्यामुळे त्यांच्यात नैराश्य येत असून त्यांची दशा वाईट होत आहे, असे वास्तव त्याने मांडले.

संघ क्रमांक १८: सडेतोड मुद्द्यांची मांडणी बाजूने (दिशा): १८ नंबरच्या संघाने तरुणांच्या सामाजिक जाणिवांवर भर दिला. आजचा तरुण फक्त स्वतःचा विचार करत नसून पर्यावरण, शिक्षण आणि समाजकार्यात पुढे येऊन देशाला नवी दिशा देत आहे, असा युक्तिवाद या वक्त्याने केला. विरोधी (दशा): विरोधी बाजू मांडणाऱ्या वक्त्याने सोशल मीडियाच्या अतिवापरावर हल्लाबोल केला. तासनतास रील्स पाहण्यात आणि आभासी जगात जगण्यात तरुणाई आपली मौल्यवान ऊर्जा वाया घालवत आहे, ही देशाची मोठी दशा आहे, असे त्याने मत मांडले.

**संघ क्रमांक ३७: वास्तववादी आणि आक्रमक युक्तिवाद**

बाजूने (दिशा): या संघातील पहिल्या वक्त्याने खेळाडू आणि स्टार्टअप सुरू करणाऱ्या तरुणांचे उदाहरण दिले. तरुणाईमधील ऊर्जा ही एक ऊबदार क्रांती आहे, जी भारताला महासत्ता बनवण्याच्या दिशेने मार्गक्रमण करत आहे, असा ठाम विश्वास त्याने व्यक्त केला. विरोधी (दशा): दुसऱ्या वक्त्याने तरुणांमधील वाढत्या व्यसनाधीनतेवर तीव्र चिंता व्यक्त केली. ड्रग्ज, दारू आणि गुन्हेगारीच्या विळख्यात अडकल्यामुळे आजची तरुण पिढी उद्ध्वस्त होत चालली आहे, असे सांगत त्याने समाजाचे डोळे उघडले. संघ क्रमांक ५५: वक्तृत्वाची शानदार जुगलबंदी... बाजूने (दिशा): ५५ क्रमांकाच्या संघातील वक्त्याने सांगितले की, तरुण हा देशाचा कणा आहे. राजकारण आणि उद्योग क्षेत्रात तरुण नेतृत्व पुढे येत असून ते देशाच्या प्रगतीला योग्य गती आणि दिशा देत आहे. विरोधी (दशा): याच्या उलट मत मांडताना विरोधी वक्त्याने सांगितले की, पाश्चात्य संस्कृतीचे आंधळे अनुकरण आणि कौटुंबिक मूल्यांचा ऱ्हास यामुळे तरुण मानसिकदृष्ट्या कमकुवत होत चालला आहे. डिप्रेशन (मानसिक ताण) मुळे तरुण दिशाहीन झाला असून त्याची दशा दयनीय झाली आहे. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून महेश अचिंतलवार , डॉ. मकरंद गिरी, धम्मपाल जाधव. यांना काम पाहिले. तर प्रा विशाल सरवदे, प्रा शैलेंद्र शेलार, प्रा कुलदीप चव्हाण यांनी संयोजन केले.

# युवक महोत्सवात पहिल्या दिवशी १२ कलाप्रकार सादर

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या लालबहादूर शास्त्री महाविद्यालयात उभारण्यात आलेल्या चार रंगमंचावर पहिल्या दिवशी १२ कलाप्रकार सादर झाले, अशी माहिती संयोजक प्राचार्य डॉ भारत खंदारे यांनी दिल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा जालना जिल्हास्तरीय युवक महोत्सवास सोमवारी थाटात सुरुवात झाली. या महाविद्यालयास तब्बल ३२ वर्षांनंतर यजमानपद मिळाले आहे. मुख्य मंडपात उद्घाटन समारंभ संपल्यानंतर लगेच सर्व संघप्रमुखांची बैठक घेण्यात आली. संचालक डॉ.कैलास अंभुरे व जिल्हा समन्वयक डॉ सुधाकर जाधव डॉ.समाधान इंगळे यांनी स्पर्धे संदर्भात सूचना व नियमावली समजून सांगितले. पहिल्या दिवशी चार सभामंडपात एकुण १२ कलाप्रकार सादर झाले. यामध्ये सृजनरंग या ठिकाणी मुकाभिनय, एकांकिका, प्रहसन, नादरंग या ठिकाणी भारतीय शास्त्रीय वादन,, भारतीय सुंगम व समूह गायन ही स्पर्धा घेण्यात आली. तर शब्दरंग या मंचावर वादविवाद, प्रश्नमंजुषा वष ललितरंग मंचावर स्पॉट फोटोग्राफी, चित्रकला, मृदुमूर्तीकला






आणि व्यंगचित्र तसेच सकाळच्या सत्रात शोभायात्रा १२ कलाप्रकार सादर झाले. उर्वरित १२ कलाप्रकार मंगळवारी सादर होणार आहेत.

**युवक महोत्सवाचा आज समारोप**

युवक महोत्सवाच्या पारितोषिक वितरण व समारोप प्रसंगी प्रकुलगुरु डॉ.प्रवीण वक्ते, कवयित्री गुंजन पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहील. संस्थेचे सचिव कपिल आकात अध्यक्षस्थानी राहणार आहेत. मंगळवारी (दि. आठ) सायंकाळी पाच वाजता हा



कार्यक्रम होईल. या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष डॉ.कुणाल आकात, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ.कैलास अंभुरे प्राचार्य डॉ भारत खंदारे व प्राचार्य डॉ सुधाकर जाधव यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दोन दिवसात चार रंगमंचावर २४ कलाप्रकार सादर होणार आहेत. दोन्ही महाविद्यालय तसेच विद्यापीठातील संयोजन समितीचे सर्व सदस्य महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रयत्नशील आहेत. मुख्य रंगमंच - सृजनरंग, शब्दरंग, स्व.बाबासहेब आकात सभागृह- सृररंग, इंदिरा मंगल कार्यालय - ललितरंग - मराठा क्रांती भवन या चार रंगमंचावर सर्व स्पर्धा घेण्यात येत आहेत.






**चार रंगमंच, २४ कलाप्रकार** मुख्य रंगमंच - सृजनरंग, शब्दरंग, स्व.बाबासहेब आकात सभागृह- सृररंग, इंदिरा मंगल कार्यालय - ललितरंग - मराठा क्रांती भवन या चार रंगमंचावर सर्व स्पर्धा घेण्यात येत आहेत. जालना जिल्ह्यातून ७९ महाविद्यालयांचे ५८१ कलावंत सहभागी होणार आहेत. यामध्ये २९२ मुले तर २८९ मुलींचा सहभाग आहे. युवक महोत्सवात संगीत, नृत्य, नाट्य, वाङःमय व ललित कला अशा पाच गटात एकूण २४ कलाप्रकार सादर होणार आहेत.

**कला गट व प्रकार पुढीलप्रमाणे**

१. **संगीत विभाग** - १. भारतीय



शास्त्रीय गायन, २. भारतीय सुगम गायन ३. भारतीय समूह गायन ४.पाश्चात्य सुगम गायन ५.पाश्चात्य वाद्य वादन २. **नृत्य विभाग** - १. भारतीय शास्त्रीय नृत्य २. लोक आदिवासी नृत्य ३. **वाडःमय विभाग** - १. वक्तृत्व २. वादविवाद ३. प्रश्नमंजुषा

४. नाटय विभाग - १. नकला १. एकांकिका ३.प्रहसन ४. मूक अभिनय ५. ललित कला विभाग - १. रांगोळी २. चित्रकला ३. कोलाज ४. पोस्टर ५. मृद मूर्तीकला ६. व्यंगचित्र ७. स्पॉट फोटोग्राफी ८.इन्स्टॉलेशन तसेच शोभायात्रा ही सांघिक स्पर्धा असणार आहे.

## ललित कलेत युवा कलावंतांनी भरले रंग पहिल्या दिवशी चार कलाप्रकार सादर

परतूर: जालना जिल्हा युवक महोत्सवात ललित रंगानं( स्टेज क्रमांकचार) - मराठा क्रांती भवन या ठिकाणी पहिल्या सत्रात फोटोग्राफी हा कला प्रकार सादर करण्यात आला. यात एकूण १६ स्पर्धकांनी सहभाग घेतला. यासाठी ग्रामीण जीवन, छाया प्रकाश व युवक महोत्सव हे विषय देण्यात आले. तर दुसऱ्या सत्रात मृदू मूर्ती कला या विषयात एकूण १३ संघांनी सहभाग घेतला. यासाठी प्राणी, खेळाडू व शेतकरी हे विषय देण्यात आले यानंतर चित्रकला या प्रकारात ५०



संघाने सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी पर्यावरण, गावचा बाजार व माझा आवडता सण हे विषय देण्यात आले होते.. या ठिकाणी परीक्षक म्हणून डॉ. गजानन पेहेरकर, डॉ. निखिल राजवर्धन डॉ. प्रशांत कसबे यांनी परीक्षण केले. या स्पर्धेचे संयोजन डॉ. सखाराम टकले, डॉ शैलेंद्र शेलार, डॉ . शरद बोराडे, डॉ कुलदीप चव्हाण यांनी केले.

## राष्ट्रवादी कॉँग्रेस विद्यार्थी व युवक आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या




परतूर : राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी परतूर तालुक्यात विद्यार्थी व युवक आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या मा. सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली तसेच पक्षाचे प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनीलजी तटकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या. राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे युवा नेतृत्व नितीन जेथलिया यांच्या हस्ते श्री. शुभम आत्माराम कठोरे, रा. परतूर यांची राष्ट्रवादी कॉँग्रेस विद्यार्थी आघाडीच्या परतूर तालुका अध्यक्षपदी, तर श्री. मनोज नारायण कर्हाळे, रा. शेरोडा, ता. (पान ३ वर)

## कृष्णा आरगडे यांनी४४ व्यांदा रक्तदान करुन दिला सामाजिक बांधिलकीचा संदेश

परतूर, प्रतिनिधी : 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश देत श्रावण सोमवार व एकादशीनिमित्त आयोजित रक्तदान शिबिरात कृष्णा आरगडे रक्तदात्याने तब्बल ४४ व्यांदा रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. या उपक्रमातून नागरिकांनी नियमित रक्तदान करून गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी पुढे यावे, असा संदेश देण्यात आला. या रक्तदान शिबिराप्रसंगी नगरसेविका रत्नमाला सतिश सोनोने, युवा मोर्चा शहराध्यक्ष विजय यादव तसेच माजी नगरसेवक कृष्णा आरगडे यांची प्रमुख उपस्थिती होती.






रक्तदानासारख्या समाजोपयोगी कार्यात नागरिकांचा सहभाग वाढणे आवश्यक असून कृष्णा आरगडे केलेले रक्तदान गरजू रुग्णासाठी जीवनदायी ठरू शकते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. माझ्या रक्ताचा प्रत्येक थेंब एखाद्याचे जीवन वाचविण्यासाठी उपयोगी पडावा आणि ईश्वराने मला सदैव समाजसेवेची शक्ती द्यावी, अशी भावना प्रश्न आरगडे ४४ व्यांदा रक्तदान केल्यानंतर व्यक्त केली. रक्तदानानंतर उपस्थितांनी कुरुक्षेत्र महादेव मंदिरात जाऊन भगवान महादेवाचे मनोभावे दर्शन घेतले व सर्वांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. श्रावण सोमवार आणि एकादशीच्या पवित्र पर्वावर धार्मिक श्रद्धेला सामाजिक सेवेची जोड देणाऱ्या या रक्तदान उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. 'रक्तदान करा, जीवन वाचवा' असा संदेशही यानिमित्ताने देण्यात आला.